# माहिती अधिकार –२००५ अंतर्गत जनगणना कार्यालयाकडील माहिती

माहितीचा अधिकार :-

कलम –४ उप कलम १(ख)(३,४,५ व६) नुसार दयावयाचे माहिती त्याबाबत कार्यपध्दती व उत्तरदायित्व त्यांची मानने व त्यासाठी वापरात येणारे नियम, विनिमय सुचना नियम पुस्तके इ. व ती कामे करण्यासाठी लागणारा कालावधी, कामाचे स्तर, स्तरावर घेतले जाणारे निर्णय व त्यांच्या कायदेशीर तरतूदी इ. बाबत लोकांच्या माहितीसाठी प्रसिध्दी पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १(ख)–३<br>निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली. | जनगणनेचे कामकाज जनगणना अधिनियम–१९४८ अन्वये केले जाते. जनगणने संदर्भातील माहिती शासनाने प्रसिध्द केले नंतर नागरिकांसाठी उपलब्ध करुन दिला जातो. |
| १(ख)–४<br>स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कडून ठरविण्यात आलेली मानके. | जनगणनेसाठी शासनाने ठरवून दिलेल्या ध्येय धोरणानुसार जनगणना केली जाते. |
| १(ख)–५<br>त्याने स्वीकारलेले किंवा त्याच्या नियत्रणांत असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याचा कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, सूचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख | जनगणना हे राष्ट्रीय कर्तव्य असून जनगणना, जनगणना अधिनियम–१९४८ (चा अधिनियम क्र.३७) अन्वये केले जाते. सदर अधिनियम दुरुस्ती अधिनियम १९९३(१९९४ चा क्र.–११) आणि मुख्य अधिनियमाच्या कलम–१८ चे पोट कलम(१) व्दारा प्राप्त झालेल्या अधिकाराने केलेल्या नियंत्रणाच्या तरतूदी अंतर्गत जनगणना घेतली जाते आणि जनगणना प्रश्नावली करण्याचा कायदेशीर अधिकार आपणास देणे व सदर अधिनियमात जनगणना अधिकारी व सर्वसमान नगरिक यांच्या जबाबदाऱ्याचा सुध्दा त्यात समावेश आहे. |
| १(ख)–६ त्याच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियत्रंणाखाली असलेल्या दस्त ऐवजांचे विविध प्रवर्गातील ववरण | जनगणना कार्यालयाकडून पुढील प्रमाणेच्या गणना शासनाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार केल्या जातात.<br>१) जनगणना –<br>२) आर्थिक गणना–<br>३) पशुधन गणना– |
| | १) जनगणना :– जनगणना शासनाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार केली जाते. व गणनेचा अहवाल शासनाने प्रसिध्द केले नतंर त्या बाबतची माहिती नागरीकांनी मागणी केले नुसार दिली जाते. मुख्यत्वये वॉर्डनुसार लोकसंख्या दाखले, जनगणना कार्यालयाकडून दिले जातात. |
| | २) अर्थिक गणना :– आर्थिक गणनेनुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उद्योग धंद्याची गणना केली जाते. त्या बाबत ची माहिती शासनाने प्रसिध्द केले नंतर सदर अहवाल नुसारची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन दिली जाते. |
| | ३) पशुधन गणना :– सदर गणनेनुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पाळीव/भटकी जनावरांची गणना केली जाते व सदर माहिती शासनाने प्रसिध्द केले नंतर सदर अहवाल नुसारची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन दिली जाते. |